# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

**अपिल क्रमांक : के.आर- ३८८/२०२१**

**अपिलार्थी, श्री. भिष्म भट्ट**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक,**
उप अधिक्षक भुमि अभिलेख वाडा यांचे कार्यालय , ता.वाडा, जि.पालघर

**प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उप अधिक्षक,**
उप अधिक्षक भुमि अभिलेख वाडा यांचे कार्यालय, ता.वाडा, जि.पालघर

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १८.५.२०२२**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|
| २८.१०.२०२० | ----- | ९.१२.२०२० | ---- |

अपीलार्थी यांनी आयोगाकडे दि.२.२.२०२१ रोजीच्या अर्जान्वये द्वितीय अपिल दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १८.५.२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी आणि तत्कालीन व विद्यमान प्रथम अपिलिय प्राधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान नमूद केले की, त्यांच्या दिनांक २८.१०.२०२० रोजीच्या माहिती अर्जान्वये, "*Action Taken Report and Explanation Letter copies of Survey Mo. R. No. ७९३३ and ७९३४.*" अशा प्रकारची माहिती मागीतली होती. सदर माहिती त्यांना मिळालेली नाही. यास्तव द्वितीय अपिल दाखल केले आहे.

तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी असे सादर केले की, त्यांनी दिनांक २७.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती दिली आहे.

प्रथम अपिलिय प्राधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२८.१२.२०२० रोजी सुनावणी घेऊन, "जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उप अधीक्षक, भूमि अभिलेख वाडा यांनी अपिलदार यांना सदरची मागणी केलेली माहिती व आवश्यक कागदपत्रे विनाविलंब ७ दिवसांत रजिस्टर पोस्टाने किंवा समक्ष विनामुल्य पुरविण्यात यावी असा निर्णय दिलेला आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, सकृतदर्शनी जन माहिती अधिकारी यांनी दि.२७.११.२०२० रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती दिलेली आहे. परंतु, सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान झाले नसल्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आता अपिलार्थीस सदरची उपलब्ध माहिती पुरविणे उचित होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## <u>आदेश</u>

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक, भूमि अभिलेख, वाडा यांनी **अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १८ मे, २०२२

(सुनील पोरवाल)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ